पुण्य नगरी

# नंदगाव जि.प. शाळेत सायबर सुरक्षेवर जनजागृती

**लोहगाव :** तुळजापूर तालुक्यातील नंदगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे शुक्रवारी (दि.४) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ सोलापूर व संगणकशास्त्र संकुल, क्विक हिल फॉउंडेशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा हा उपक्रम राबविण्यात आला.

या उपक्रमामध्ये संगणकशास्त्र संकुलातील प्रविण कोळी व सिद्रामय्या स्वामी या विद्यार्थ्यांनी



सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या विषयावर सेमिनार आयोजित केला. या सेमिनारमध्ये त्यांनी आजच्या ऑनलाइन युगामध्ये होणाऱ्या विविध प्रकारच्या फसवणुकीबद्धल उदाहरणाद्वारे माहिती दिली. अर्थात कोणीही ओटीपी कोणास सांगू नये, अनोळखी नंबर वरून आलेल्या फोन कॉल्सची पडताळणी करून घ्यावी तसेच फेसबुक, इंस्टाग्राम, व्हॉटसॲप व इतर सोशल मीडिया साईटसवर आलेल्या मेसेजेस व लिंकची शहानिशा करून त्यानंतरच पुढील प्रक्रिया करावी याबाबत मार्गदर्शन केले. यावेळी मुध्याध्यापक पी. आर. वाकडे, जी. बी. खंदारे, एम. टी. धोत्रे, ए. के. कुंभार, पी. डी. कदम, एस. डी. आडे, एच. जी. उपासे, ए. एस. आवटे, आर. एस. वायकर, डी. डी. कदम, बी. जे. मंडले, व्हि. एच. सगर, ए. एम. घंटे यांच्यासह ग्रामस्थ, विद्यार्थी उपस्थित होते.

Osmanabad Edition
Oct 06, 2024 Page No. 02
Powered by: erelego.com